(304)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-॥, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/1134/२०२३
दिनांक :-12/09 /२०२३

## "जाहीर नोटीस"
## (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

<u>प्रस्तावना-</u>

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **"उक्त अधिनियम"** असा करणेत आला आहे) चे कलम ३ अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करण्यात आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

(२) ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुनर्वसन योजनेचे कामकाज सुरु असुन, त्या अनुषंगाने सदर जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेचे या कार्यालयाचे नियोजन आहे; आणि,

(३) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुरवणी, पृष्ठ क्र.२४१०, दि.०९/११/२००० रोजी प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले असलेबाबतचा दाखला सहाय्यक अभियंता, उपायुक्त क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिलेला आहे; आणि,

(४) ज्याअर्थी, विकसक यांनी दि.०१/०९/२०२३ रोजी दिलेल्या पत्रानुसार योजनेचे कामकाज जलद गतीने पुर्ण होवुन झोपडीधारकांना सदनिका मिळणेचे दृष्टीने विकसक यांनी सदर मिळकतीवरील ८४६.५० चौ.मी. एवढया क्षेत्रावर झोपडपट्टी (Slum Occupied Plot) वसलेली असुन, उर्वरीत मिळकत ही झोपडपट्टी विरहीत (Non Slum Plot) असुन ८४६.५० चौ.मी. क्षेत्राचा उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश (३क) करणेबाबत विनंती केली आहे; आणि,

(५) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र गलिच्छ वस्ती सुधारणा क्षेत्र म्हणुन अधिसूचित केलेबाबत सहायक अभियंता, उपायुक्त वि.क्र.४ कार्यालय, पुणे मनपा., पुणे यांचेकडील दि.०२/०५/२०१० रोजीच्या या दाखल्यान्वये विकसक यांनी सादर केलेचे दिसुन येते. तसेच मोजणी नकाशानुसार झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र ८४६.५० चौ.मी. व झोपडपट्टी विरहीत क्षेत्र २४७८.३३ चौ.मी. असे एकुण त्रिकोणमिती पध्दतीने येणारे क्षेत्र ३३२४.८३ चौ.मी. असुन ७/१२ उताऱ्यानुसार २९१६.०० चौ.मी. क्षेत्र असलेबाबत उपअभियंता, तांत्रिक विभाग क्र.१, झोपुप्रा., पुणे यांनी सादर केले आहे. त्यामुळे, झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र ८४६.५० चौ.मी इतक्या क्षेत्राकरीता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र ३(क) पुर्वसूचना घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे; आणि,

(६) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील" असे नमूद केले आहे; आणि,

(७) त्याअर्थी, अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत.

सबब, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्या संदर्भातील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने व ती महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये घोषीत असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

(२) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी

स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव:-** स.नं.४/अ/१ब/१अ, ४/अ/१ब/२, ४अ/१४ब/२, सि.स.नं.३९३/४, कोंढवा खुर्द, पुणे
**महानगरपालिका क्षेत्र** :- पुणे महानगरपालिका.

| गाव - कोंढवा खुर्द, पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. | जमीन/ भोगवटदाराचे नाव अथवा हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे / व्यक्तीचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजना क्षेत्राची चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.४/अ/१ब/१अ, ४/अ/१ब/२, ४अ/१४ब/२, फाळणी प्रमाणे स.नं.४अ, हि.क्र.१३पै. १४पै., सि.स.नं.३९३/४, कोंढवा खुर्द, पुणे | खाजगी - मे.प्रायमार्क डेव्हलपर्स तर्फे श्री.मालव जयंत शहा | ८४६.५० चौ.मी. (झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र) | लागु हि.क्र.१२ | जागेवरील रस्ता | लागु स.नं.४ब व लागु हि. क्र.१५ | लागु रस्ता व वानवडी शीव |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- / /२०२३

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा, पुणे-०१ यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
    a. उपायुक्त, ग.व.नि. विभाग, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे मनपा., पुणे यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
३. जमिन मालक - मे.प्रायमार्क डेव्हलपर्स तर्फे श्री.मालव जयंत शहा यांना माहितीस्तव.